# जाहिर सुचना (नोटीस)

मा.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र यांचे कडील पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-2017/प्र.क्र.17/का.8/दिनांक 01/09/2017 अन्वये रत्नागिरी जिल्हयातील मुदत संपणाऱ्या 215 ग्रामपंचायतींचा सार्वत्रिक निवडणूकांचा कार्यक्रम जाहिर करण्यात आलेला आहे.

रत्नागिरी जिल्हयातील 215 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूक कामी विविध प्रकारचे लिफाफे छपाई करावयाची आहे. छपाई करणेच्या लिफाफ्यांच्या नमुन्यांची यादी यासोबत आहे.

त्यानुषंगाने लिफाफे छपाई करुन पुरवठा करणाऱ्यांना सूचित करण्यात येत आहे की, या कार्यालयाला आवश्यक असणाऱ्या विविध नमुन्याचे सोबतच्या यादीप्रमाणे नमुद संख्येबाबत छपाईचे दर पत्रक मागविण्यात येत आहे. ज्यांना सदरचे छपाईचे काम/वस्तूंचा पुरवठा करण्यास इच्छा असेल त्यांनी दिनांक 29/09/2017 पर्यंत नमुने छपाईबाबतचे दर पत्रक सर्वसाधारण शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी येथे समक्ष सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 या कार्यालयीन कामकाजाची दिवशी व वेळी लेखी बंद लखोटयात सादर करावे. मुदती नंतर आलेल्या दर पत्रकांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोदं घ्यावी. छपाईबाबतच्या अधिक माहितीसाठी तसेच अटी व शर्तीबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, सर्वसाधारण शाखा येथे संपर्क साधावा.

प्राप्त झालेले पुरवठादार यांचे दरपत्रक दिनांक 03/10/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे दालनात उघडण्यात येतील याची नोंद घ्यावी.

क्रमांक. ससाशा/ग्रापनि/कार्या-1/लिफाफे छ./2017
जिल्हाधिकारी कार्याल,रत्नागिरी
दिनांक - 21/09/2017

(बाबासाहेब जा. बेलदार)
जिल्हाधिकारी रत्नागिरी

प्रतिलिपी :-

1. जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी यांचे सूचना फलकावर प्रसिध्दीसाठी
2. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांजकडे

   2/- सदरचे जाहिर सूचना(नोटीस) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळांवर प्रसिध्द करणेत यावी.
3. अनघादत्त लक्ष्मी प्रिंटर्स, रा. मारुती मंदिर, ता.जि. रत्नागिरी यांना माहितीसाठी
4. श्री ज्ञानेश्वर मुद्रण मंदिर, 39/40, शंखेश्वर गार्डन, गीता भवन समोर, रत्नागिरी यांना माहितीसाठी
5. व्यंकटेश ऑफसेट प्रिंटर्स, 2673, फगरवठार, परटवणे रत्नागिरी यांना माहितीसाठी
6. आयडियल सर्व्हिसेस, टिळक आळी, रत्नागिरी यांना माहितीसाठी

जिल्हाधिकारी अधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालय.
पत्ता :- सर्वसाधारण शाखा, तळ मजला, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी, 415611
दुरध्वनी क्रमांक :- 02352-222483, ई मे आयडी:- gb_ratnagiri@rediffmail.com

---

रत्नागिरी जिल्हयातील ग्रामपंचायत निवडणूकीकरीता आवश्यक निवडणूक विषयक विविध प्रकारचे फलक, व बिल्ले, साहित्य छपाई करुन पुरवठा करणेकरिता खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यताप्राप्त पुरवठा दारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती :-**

1. दरपत्रक दाखल करतेवेळी दरपत्रकासोबत इसारा रक्कम रू. १०,०००/- (अक्षरी रू. दहा हजार मात्र ) स्टेट बँक ऑफ इंडिया, रत्नागिरी येथील बँकेचा, तहसीलदार सर्वसाधारण जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी, यांचे नांवे धनाकर्षाव्दारे (Demand Draft) जोडलेली असावी. इसारा रक्कम भरलेली नसल्यास दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.
2. अर्जदार कोणत्याही राजकीय पक्षांशी संबंधीत असता कामा नये. तसेच तो राजकीय पक्षाचा सहानुभूतींकर्ता किंवा कोणत्याही राजकीय पुढा-यांचा हितसंबंध, नातेवाईक असता कामा नये. त्याबाबत प्रमाणपत्र/ घोषणापत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे.
3. निवडणूक शाखेतील वरीष्ठ अधिका-यांच्या सूचनेनूसार आणि त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा मुख्यालयी तसेच तालुका मुख्यालयी ठिकाणी व कोणत्याही वेळी मागणीनुसार निवडणूक साहित्य व लेखन सामग्रीचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.
4. केंद्र शासनाच्या वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 मधील तरतुदीनुसार दरपत्रक सादर करताना त्यामध्ये GST नमुद करुन दर पत्रक सादर करावे.
5. पुरवठा दाराने सर्व सामग्री / साहित्य पोहोच करणेची आहे त्यासाठी इतर कोणताही खर्च किंवा आकार देय होणार नाही.
6. पुरवठादारास कोणत्याही प्रकारचे अग्रिम (ॲडव्हान्स ) दिला जाणार नाही .
7. सर्व सामग्री / साहित्य उत्तम प्रतीचे /दर्जाचे असणे बंधनकारक राहिल.
8. काम पूर्ण झाल्यानंतर सर्व देयके तीन प्रतीत सादर करणेत यावीत. देयक प्राप्त झालेनंतर अनुदान उपलब्धतेनुसार देयेके अदा करणेची कार्यवाही करणेत येईल.
9. वरील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास व अधिका-यांनी दिलेल्या लेखन सामग्रीचा पूरवठा वेळेवर न झाल्यास इसारा रक्कम रु. 10,000/- जप्त करुन सरकारजमा करणेत येईल.
10. मंजूर दरपत्रकाचा वैधता कालावधी मंजूरी दिनांकापासून 15 दिवसाचा राहिल.
11. दरपत्रक मंजूर झालेल्या पुरवठादाराने जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात रु.२००/-(अक्षरी रु. दोनशे मात्र) इतक्या रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.
12. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील.
13. सदरची दरपत्रक सूचना व त्यातील कोणताही भाग कोणतीही पूर्व सूचना न देता रदद् करणेचा /राखून ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा हक्क जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी राखून ठेवला आहे.
14. दरपत्रकातील नमुद साहित्याचा पुरवठा शासनाकडून किंवा मा.राज्य निवडणूक आयोगाकडून झाल्यास सदर साहित्य पुरवठादाराकडून मिळवून घेणे जिल्हाधिकारी यांचेवर बंधनकारक राहणार नाही.
15. दरपत्रक मंजूर केल्याच्या दिनांकापासून 7 दिवसात संबंधीत साहित्याचा पुरवठा करणे व पुरवठादारावर बंधनकारक आहे.

साहित्याच्या तपशिलाबाबत / दर्जाबाबत शंका निर्माण झाल्यास किंवा अधिक माहिती आवश्यकता असल्यास छपाईचे नमुने, बिल्ले व लिफाफ्याचा आकार इ. माहितीसाठी तहसिलदार सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांचेशी तात्काळ संपर्क साधावा.

जिल्हाधिकारी रत्नागिरी

जिल्हाधिकारी, रत्नागिरी

# माहे नोव्हेंबर व डिसेंबर 2017 या कालावधीत मुदत संपणाऱ्या 222
# ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक 2017
# निवडणूक कामी लागणाऱ्या विविध प्रकारचे लिफाफे छपाई कामाकरिता पुरवठा करण्यासाठीचे दरपत्रक

| | लखोटयावरील नाव | संख्या |
|---|---|---|
| 1 | लहान लिफाफ्या करिता (सांविधानिक लिफाफे) (एस.ई.-8) 16"×12" | 800 |
| 2 | (एक) मतदार यादीची चिन्हांकित प्रतीसाठी लिफाफा (एसई-8) 11"×15" | 800 |
| 3 | (दोन) मतदार यादीच्या इतर प्रतीसाठी (एसई-8) 11"×15" | 800 |
| 4 | (तीन) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका व प्रदत्त मतदाराच्या यादीसाठी (11"×15") | 800 |
| 5 | (चार) मतदारांची स्वाक्षरी असलेल्या मतदारांच्या नोंदवहिकिरिता (नमुना व्हीएम-1)(एसई -8) 11"×15" | 800 |
| 6 | (पाच) वापरलेल्या मतदार चिठ्या (स्लिपा) ठेवण्यासाठी (एसई-7) 11"×15" | 800 |
| 7 | (सहा) मतदान सुरु होण्यापूर्वी व मतदान संपल्यावर मतदान केंद्राध्यक्षाव्दारे करण्यात येणा-या घोषणापत्राकरिता लिफाफा (एसई -7) 11"×5" | 800 |
| 8 | असंविधानिक लिफाफे एकत्रित ठेवण्यासाठी मोठा लिफाफा (एस.ई.-8) 16"×12" | 800 |
| 9 | (दोन) मतदान प्रतिनिधींची नेमणूक पत्रासाठी लिफाफा (एसई-6) 11"×5" | 800 |
| 10 | (तिन) आक्षेपित मतांच्या यादीसाठी (एसई-5) 11"×5" | 800 |
| 11 | (चार) अंध व विकलांग मतदारांची यादीसाठी लिफाफा(एसई-5) 11"×5" | 800 |
| 12 | (पाच) पावती पुस्तके आणि समपहरण केलेल्या रकमेसाठी लिफाफा (एसई-6) 11"×5" | 800 |
| 13 | (सहा) न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहरासाठी (एसई-5) 11"×5" | 800 |
| 14 | न वापरलेल्या / खराब पट्टी सील साठी (स्ट्रीप सील) लिफाफा (एसई-7) 11"×5" | 800 |
| 15 | न वापरलेल्या / खराब झालेल्या विशेष टॅग साठी लिफाफा (एसई-7) 11"×5" | 800 |
| 16 | सोबतच्या घोषणपत्रासाठी (एसई-5) 11"×5" | 800 |
| 17 | इतर संबधित कागदपत्रासाठी (एसई-5) 11"×5" | 800 |
| 18 | न वापरलेल्या मतपत्रिकांसाठी (एसई-7) 11"×5" | 800 |
| 19 | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने मोहोरबंद असलेल्या लिफाफ्यामध्ये अन्य कोणतेही पेपर ठेवण्याचे ठरविले आहे त्यासाठी 11"×5" | 800 |
| 20 | इतर साहित्य ठेवण्यासाठीचे तिसरे पाकिट (एस.ई.-8) 16"×12" | 800 |
| 21 | मतदान केंद्राध्यांची दैनंदिनीच्या अहवालाकरिता (एसई-6)11"×5" | 800 |
| 22 | नोंद केलेल्या मतांचा हिशोबासाठी (नमुना व्हीएम-3) (एसई-5)11"×5" | 800 |
| 23 | निवडणूककार्य प्रमाणपत्राकरिता लिफाफा (एसई-5) 11"×5" | 800 |
| 24 | लहान लिफाफे (इतर)(एसई-7) (एस.ई.-8) 11"×5" | 800 |
| 25 | कोरे लिफाफे (एसई-7)/2(एसई-8)/3 11"×5" | 2400 |